वेंगुर्ले पॉवरहाऊस येथे झाड कोसळले

वेंगुर्ले : वेंगुर्ले-तुळस मार्गावर वीज वितरण कंपनीच्या कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेले पॉवरहाऊस येथे धोकादायक आंब्याचे झाड शनिवारी सायंकाळी मुख्य रस्त्यावर कोसळले. यावेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या टेम्पो गाडीवर हे झाड पडले. मात्र सुदैवाने मोठा अनर्थ टळला. काही का या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. वेंगुर्ले तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून पावसाची रिपेरिप सुरू आहे. आज सकाळी तालुक्यातील होडावडा पुलावर पाणी आल्याने काही काळ वाहतूक ठप्प होती. दरम्यान, सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पॉवर हाऊस येथील धोकादायक जुने मोठे झाड कोसळल्याने वीज वाहिन्या तुटून वीज पुरवठा खंडित झाला आहे.

रोहन भंसाळीच्या प्रकल्पाची नासाच्या क्यूब इन स्पेस प्रोग्राममध्ये निवड

पुणे : बालपणीच विज्ञानाची गोडी लागली आणि तो छंद बनला. त्याच छंदामुळे अवघ्या ११ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचण्याचा मान मिळाला. ही कथा आहे पुण्यातील रोहन भंसाळी याची. एवढ्या छोट्या वयात अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक् अँड स्पेस अॅडमिनिस्ट्रेशन (नासा) या संस्थेच्या योजनेत सहभागी होण्याची संधी त्याला मिळाली आहे. त्यातून पुण्याच्या शिरपेचातही आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नासाच्या अंतराळ मोहिमांची रचना निर्मिती करून त्यात प्रयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना देणारा क्यूब इन स्पेस प्रोग्राम ही योजना आहे. यात वास्तविक जगातील किंवा पृथ्वीशी संबंधित समस्यांबाबत छोट्या पातळीवरील प्रयोग केले जातात. यातच ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना तळहातावर मावेल एवढा उपग्रह तयार करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. अंतराळात जाणारे मनुष्य, सामान आणि यान यांचे अती तीव्र अल्ट्रा-व्हायोलेट किरणोत्सर्गापासून (यूव्ही, सी, बी, ए) अधिक चांगले रक्षण व्हावे, यासाठी विविध औद्योगिक साहित्याचा यात अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये रोहन भंसाळी याच्या प्रयोगाचीही निवड झाली आहे. यासाठी नासाच्या चमूने विविध पातळ्यांवर अत्यंत काटेकोरपणे चाचण्या घेतल्या.

रोहन याने तयार केलेल्या क्यूबमध्ये ४ यूव्ही सेन्सॉर्स, ३ निवडक पदार्थ (रेशीम, अॅल्युमिनियम आणि प्लॅस्टिक) आणि मायक्रोप्रोसेसर यांचा समावेश आहे. या क्यूबने स्ट्रॅटोस्फिअरमध्ये केलेल्या १२ तासांच्या प्रवासात प्रत्येक ५ मिनिटांनी यात माहिती गोळा करण्यात येणार आहे. स्ट्रॅटोस्फिअर हा वातावरणातील १,६४,०४१ फूट उंचीवरील भाग असतो. त्या तुलनेत विमाने ही समुद्रसपाटीपासून ३०,००० फुटांवरून उडतात.

विद्या व्हॅली स्कूलमध्ये सहावीत शिकणाऱ्या रोहनने आत्मविश्वास आणि उत्साहाने सांगितले, "शाळेतील माझ्या शिक्षिका जया मॅडम यांच्याकडून मला या प्रकल्पाची माहिती मिळाली. मला विज्ञानाची आवड असल्यामुळे त्यासाठी अर्ज करण्यासाठी माझी निवड करण्यात आली. विद्या व्हॅलीच्या प्रिंसिपल नलिनी सेनगुप्ता अशा उपक्रमांमध्ये सहभागी नेहमी होण्यासाठी प्रोत्साहन देतात. यात शाळेचा पाठिंबा आणि प्रोत्साहन माझ्यासाठी खरोखरच खूप महत्त्वाचे ठरले."तो पुढे म्हणाला, "मला विज्ञानात रस आहे आणि मला अभ्यासक्रमाशिवायही इतर उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला आवडते. विज्ञानातील नवीन संकल्पना जाणून घ्याव्यात, या हेतून मी यात हभागी होण्याचे ठरवले. कुटुंबातील सदस्यांनीही मला उत्तेजन दिले आणि पाठिंबा दिला."

या प्रकल्पाविषयी अधिक माहिती देताना रोहन म्हणाला, "अंतराळ हे खूप रोमांचक आहे आणि अजूनही खूप अज्ञात आहे. आपल्या सूर्यमालेची त्रिज्या जवळपास ९ अब्ज किमी एवढी आहे आणि एका सूर्यामध्ये १३ लाख पृथ्वी बसू शकतात. मी संशोधन करत असताना या अचंबित करणाऱ्या गोष्टी मला कळाल्या. म्हणून, सामान्यपणे वापरल्या जाणाऱ्या पदार्थांवर, उदा. कपड्यांसाठी रेशीम किंवा अन्न आणि औषधांच्या पॅकेजिंगवर होणारा परिणाम याचा अभ्यास मला करायचा होता."

या प्रकल्पावर अधिक प्रकाश टाकताना तो म्हणाला, "मी सेन्सॉर्स, एक छोटा संगणक आणि कोडेड प्रोग्राम असलेला ४ बाय ४ सें.मी.चा प्रयोग तयार केला. तो आपोआप चालेल. मला अतिशय विलक्षण अनुभव मिळाला आणि या प्रयोगाचा परिणाम पाहून मी खूप उत्साहित आहे." येथे हे उल्लेखनीय आहे, की अंतराळ मोहिमेदरम्यान मानवी शरीरावर किरणोत्सर्गासारख्या प्रतिकूल परिणाम करणाऱ्या धोक्यांवर नासा संशोधन करत आहे. अगदी बचावात्मक कवच असतानाही अंतराळवीरांना दररोज छातीच्या एक्स-रेच्या तुलनेत ८ पट किरणोत्सर्गाला सामोरे जावे लागते. त्यामुळे, अतिनील किरणांपासून कोणता पदार्थ जास्त संरक्षण देईल आणि अंतराळवीरांचा बचाव करेल हे ठरवण्यासाठी दैनंदिन वापरात वापरले जाणारे रेशीम, अॅल्युमिनियम व प्लॅस्टिक अशा साहित्याची निवड करण्यात आली.

इंडियन बँक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

कोपरखैरणे शाखा: क्रिश्ना हाईट्स, सेक्टर २ए, प्लॉट क्र. ८, कोपरखैरणे-४००७०९, नवी मुंबई, महाराष्ट्र.

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी **इंडियन बँकेचे** प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सेकंड) अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन **३०.०१.२०२३** पासून पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्चासह सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात प्रदानाच्या तारखेपर्यंत **३०.०१.२०२३** पासून मान्य केलेल्या दराने सदर रकमेवरील पुढील व्याज आणि **२९.०१.२०२३ रोजीस रु. १९,६६,७८४/-(रु. एकोणीस लाख सहासष्ट हजार सहाशे चौऱ्याऐंशी मात्र)** अशी सूचनेत नमुद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी **कर्जदार (गृह कर्ज खाते क्र. ५०३९०११०५३८) श्री. राकेश किशोर दख्खनकर आणि श्री. किशोर मारुती दख्खनकर (कर्जदार/गहाणवटदार)** यांना बोलाविण्यासाठी ०८.०२.२०२३ रोजीची मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन कर्जदार आणि **सर्वसामान्य जनतेला** सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **१५ जुलै, २०२३** रोजी सदर अॅक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा **कब्जा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि **सर्वसामान्य जनतेला** याद्वारे सावधान करण्यात येते की, सदर मिळकतीसह व्यवहार करु नये आणि सदर मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा **१५.०७.२०२३** रोजीस **२०,३९,८८१.२८ (रुपये वीस लाख एकोणचाळीस हजार आठशे एक्याऐंशी आणि पैसे अठ्ठावीस मात्र)** आणि सदर रकमेवरील प्रदानाच्या तारखेपर्यंत **१६.०७.२०२३** पासून मान्य केलेल्या दराने पुढील व्याज या रकमेकरिता **इंडियन बँक, कोपरखैरणे शाखेच्या** प्रभाराच्या अधीन राहील.

१५.०७.२०२३ रोजीस ब्रेकअप सह तपशिल खालील प्रमाणे

खाते क्र.	पुस्तकी शिल्लक	उपार्जित व्याज	थकीत दंड	शुल्क/प्रभार/एमओएक्स	एकूण
५०३९०११०५३८ एचएल-एडीव्हीटीजीई-आरईएसएफएल०टी७५एल एमसीएलआर	१९,०९,५३२/-	१,३०,३४९.२८	-	-	२०,३९,८८१.२८
			खात्यामधील एकूण थकबाकी		२०,३९,८८१.२८

कर्जदार/हमीदार/कॉर्पोरेट हमीदार यांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळ मर्यादेच्या संदर्भात अॅक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर आणि जंगम मिळकतीचे वर्णन:

गहाण मत्ता: फ्लॅट क्र. ३, मोजमापित ३७३ चौ.फू. चटई क्षेत्र, १ला मजला, ए विंग, ब्ल्यू बे बिल्डिंग, गट क्र. ३०/३, हिस्सा क्र. १३, १४, १८, १९ आणि २०, गाव दहिवली तर्फे नीड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड-४१०२०१. मिळकत द्वारे सीमाबध्द: *उत्तर: शिवम अपार्टमेंट, *दक्षिण: बी विंग, *पूर्व: ओपन प्लॉट * पश्चिम: ओपन प्लॉट

सही/-
दिनांक : १५.०७.२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : कोपरखैरणे **इंडियन बँक करिता**

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)

निर्मल लाईफस्टाइल (मुलुंड) प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहितीकरीता

	संबंधित तपशील	
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**निर्मल लाईफस्टाइल (मुलुंड) प्रायव्हेट लिमिटेड**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	२० डिसेंबर, २००७
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित /नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी निबंधक - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर / लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर	यु७४९९९एमएच२००७पीटीसी१७७०१९
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	निर्मल लाईफस्टाइल हेड ऑफिस, एलबीएस मार्ग, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०००८०.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख	११ जुलै २०२३ (आयआरपी ला मिळालेल्या आदेशाची प्रत १२ जुलै २०२३)
७	नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख	७, जानेवारी २०२४
८	अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	**नाव :** अमित विजय कारिया **नोंदणी क्र.** आयबीबीआय/आयपीए ००१/आयपी-पी०२६००/२०२१-२२/१३९६९ एफए नं.: एए१/१३९६९/०२/२४१२२३/१०५३०३ २४ डिसेंबर, २०२३ पर्यंत वैध
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल	**नोंदणीकृत पत्ता :** फ्लॅट २०२, पद्मालया अपार्टमेंट, पंडित कॉलनी लेन १, आनंद लॉंड्री च्या मागे, नाशिक - ४२२००२ (महाराष्ट्र) **इ-मेल :** amit.karia@yahoo.co.in
१०	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	**पत्रव्यवहार पत्ता :** ४०८, हिंद राजस्थान बिल्डिंग, डी. एस. फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई - ४०००१४. **पत्रव्यवहार इ-मेल :** cirp.nirmalmulund@gmail.com
११	दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख	**२६ जुलै, २०२३ (आदेश मिळाल्याच्या तारखेपासून १४ दिवस)**
१२	अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास	कलम ५(८) च्या खंड (एफ) नुसार रिअल इस्टेट प्रकल्पांतर्गत वाटपग्राही
१३	एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	**१. आयपी सत्या नारायण बहेटी** आयबीबीआय/आयपीए ००१/आय-पी०१७५९/२०१९-२०/१२६७०) **२. आयपी प्रकाश व्ही कुकरेजा** आयबीबीआय/आयपीए ००१/आयपी-पी०२५९९/२०२१-२२/१३९९० **३. आयपी यतीनकुमार एस शहा** आयबीबीआय/आयपीए ००१/आयपी-पी०१७८५/२०१९-२०/१२७६४
१४	(ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	(a) वेब लिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloadform.html (b) **पत्रव्यवहार इ-मेल आयडी :** cirp.nirmalmulund@gmail.com

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ** यांनी जुलै ०४, २०२३ रोजी तिच्या आदेशा द्वारे **निर्मल लाईफस्टाइल (मुलुंड) प्रायव्हेट लिमिटेड** च्या नादारी निर्णय प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला.

निर्मल लाईफस्टाइल (मुलुंड) प्रायव्हेट लिमिटेड च्या धनकोंना याद्वारे अंतरिम निर्णय व्यावसायिकांकडे बाब क्र. १० समोरील पत्त्यावर १८ जुलै, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यात येते.

वित्तीय धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी पुराव्यांसह त्यांचे दावे व्यक्तिश:, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.

नोंद क्र. १२ सापेक्ष सूचीबध्द असलेल्या एका वर्गाशी संबंधित असलेला वित्तिय धनको, फॉर्म सीए मधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नोंद क्र. १३ सापेक्ष तीन नादार व्यावसायिकांपैकी अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड सूचित करावा.

दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.

सही/-
अमित विजय कारिया
अंतरिम निर्णय व्यावसायिक
निर्मल लाईफस्टाइल (मुलुंड) प्रायव्हेट लिमिटेड
दिनांक : १४ जुलै, २०२३ **नोंदणी क्र.** आयबीबीआय/आयपीए ००१/आयपी-पी०२६००/२०२१-२२/१३९६९
ठिकाण : मुंबई **एफए:** एए१/१३९६९/०२/२४१२२३/१०५३०३ वैध डिसेंबर २४, २०२३ पर्यंत

मराठवाड्याच्या विकासाला चालना - डॉ. कराड

औरंगाबाद : केंद्र व राज्य शासनाकडून मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व क्षेत्रात विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. रेल्वेमार्ग, रस्ते, शेती, उद्योग, पाणी, आरोग्य यासह मराठवाड्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यात येईल व त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे प्रतिपादन केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी केले. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी आपले सर्वोतोपरी सहकार्य असेल. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रमात सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहनही त्यांनी केले.

स्वामी रामानंद तिर्थ सभागृहात झालेल्या मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत आयोजित बैठकीत डॉ. कराड बोलत होते. यावेळी उद्योगपती राम भोगले, ज्येष्ठ पत्रकार निशिकांत भालेराव, श्रीमती रश्मीताई बोरीकर, अॅड.जी.आर.देशमुख आदी उपस्थित होते. डॉ.कराड म्हणाले, मराठवाड्याच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र व राज्य सरकाराकडून मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. जायकवाडी प्रकल्पातून आपल्या महानगरासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम गतीने सुरू आहे. याबाबत आपण सातत्याने आढावा घेत असून ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी जलजीवन मिशन अंतर्गत कामांना गती देण्यात आली आहे. या कामासाठी भरीव निधी देण्यात आला असून कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू दिला जाणार नाही. मराठवाड्यातील रेल्वेमार्गाला गती देण्यासोबतच औरंगाबाद व जालना येथे रेल्वे वर्कशॉपचे काम अंतिम टप्प्यात आहे. २४ डब्ब्यांचे हे मोठे वर्कशॉप असून यामुळे रेल्वेसेवेला गती मिळण्यास मदत होणार आहे. वंदे भारत ही रेल्वेसेवाही मराठवाड्यात लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न आहे. नगरपर्यंत रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झाले असून हा रेल्वेमार्ग सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बँक

वाशी शाखा: सिडको जुना प्रशासन इमारत, पी-१७, सेक्टर-१, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३
ई-मेल : brmgr353@mahabank.co.in
मुख्य कार्यालय: लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११००५

एई१५/सरफैसी/२०२२-२३ १३.०६.२०२३

रजिस्टर ए.डी/हॅण्ड डिलिव्हरीने

प्रति,

१. मे. एमवाय डी मॉल (कर्जदार), न्यू रचना पार्क हाऊसिंग सोसायटी, मनोरमा नगर, ठाणे-४०० ६०७.

२. श्री. हरेश वाघजी चौधरी (क्र. १ चे भागीदार) प्लॉट क्र. ६२, रष्मी प्रोव्हिजन स्टोरसमोर, मनोरमा नगर, कोलशेत रोड, ठाणे पश्चिम-४०० ६०७. **येथे देखिल:** ८०२, कॉसमॉस टॉवर, एलबीएस रोड, गोल्डन पार्क सोसायटीसमोर, ठाणे पश्चिम-४०० ६०१.

३. श्री. रमेश वाघजी चौधरी (क्र. १ चे कार्यालय) प्लॉट क्र. ६२, रष्मी प्रोव्हिजन स्टोरसमोर, मनोरमा नगर, कोलशेत रोड, ठाणे पश्चिम-४०० ६०७. **येथे देखिल:** फ्लॅट क्र. २३३, बिल्डिंग क्र. एच-१, मेपल कल्पतरु इम्मेंशिया कोलशेत रोड, बालकुम, ठाणे पश्चिम-४०० ६०७.

४. श्रीम. भानुमती कांतीलाल हरसोरा (हमीदार) ८०२, कॉसमॉस टॉवर, एलबीएस रोड, गोल्डन पार्क सोसायटीसमोर, ठाणे पश्चिम-४०० ६०१.

५. श्री. नरेंद्र कांतीलाल हरसोरा (हमीदार) ८०२, कॉसमॉस टॉवर, एलबीएस रोड, गोल्डन पार्क सोसायटीसमोर, ठाणे पश्चिम-४०० ६०१.

६. श्री. कौशिक कांतीलाल हरसोरा (हमीदार) ८०२, कॉसमॉस टॉवर, एलबीएस रोड, गोल्डन पार्क सोसायटीसमोर, ठाणे पश्चिम-४०० ६०१.

विषय: सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट अॅक्ट २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना.

१. की, तुम्ही क्र. १ तुमच्या विनंतीनुसार बँक ऑफ महाराष्ट्र, वाशी शाखेद्वारे पुढील पत सुविधा मंजुरी केलेल्या आहेत. तुम्ही क्र. २ आणि ३ क्र. १ चे भागीदार आहेत. तुम्ही क्र. २, ३, ४, ५ आणि ६ क्र. १ ला दिलेल्या पत सुविधासाठी हमीदार आहात.

२. पतसुविधा बँकेच्या नावे भारित तारण आणि विद्यमान थकबाकीचा तपशील खालीलप्रमाणे-

अ. क्र.	पत सुविधाचा प्रकार आणि रक्कम	तारण	एनपीएची तारीख
(१)	(२)	(३)	(४)
१	रु. १५० लाखाची कॅश क्रेडिट सुविधा खाते क्र. ६०३३१ ६६६८०७	प्रथम तारणः स्टॉक आणि येणेच्या जंगम गहाण दुय्यम तारणः निवासी फ्लॅट क्र. ८०२, २रा मजला, कॉसमॉस टॉवर, एलबीएस मार्ग, गोल्डन पार्क सोसायटी समोर, सर्व्हे क्र. ३२/१०, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम, मोजमापित ९९५ चौ. फूट	०८.०६.२०२३
२	रु. ५६.०० लाखची मुदत कर्ज सुविधा खाते क्र. ६०३४४१८५१०८		
३	रु. ३०.०० लाखाची जीईसीएल सुविधा खाते क्र. ६०३५७३५०३६१		
४	रु. ४८५५०००/- ची एफआयटीएल खाते क्र. ६०३८७५३८६३२		

लेजर थकीत (१३.०६.२०२३ रोजीस)	१३.०६.२०२३ पर्यंतचे न लावलेले व्याज	१३.०६.२०२३ रोजीस एकूण थकबाकी
(५)	(६)	(७)
रु. १,५२,३१,२७२.७८	रु.२,९२,४९७.२२	रु. १,५५,२३,७७०
रु. ५८,०३,०५१. ००	रु. ७,८९,३३३.००	रु. ६५,९२,३८४
रु. १७,९६,६६५.६१	रु. ८६,०८३	रु. १८,८२,७४८.६१
रु. ४३,९९,८९०.९८	रु. ५,५७,८१६.००	रु. ४९,५७,७०६.९८

३. प्राप्त पतसुविधेच्या मोबदल्यात, तुम्ही खालील दस्तावेजांसह बँकेच्या नावे आवश्यक दस्तावेज समाविष्ट पुढील दस्तावेज निष्पादित केले आहेत आणि वरील नमूदनुसार बँकेच्या नावे तारण आणि भारसुध्दा निर्माण केले आहे.

अ. क्र.	दस्तावेजांच्या तपशील	दस्तावेज निष्पादित केलेल्या तारीख
१	पत सुविधेसाठी अर्ज	२९.०५.२०१९
२	आरएफ ४६/४७ डिमांड प्रॉमीसरी नोट	२९.०५.२०१९,१०.०६.२०२०
३	आरएफ ६६ जे जंगमगहाणाच्या विलेख	२९.०५.२०१९, ११.१०.२०१९, १०.०६.२०१९
४	आरएफ १५४ ए हमी	२९.०५.२०१९, १०.०६.२०२०
५	प्रस्तावित समन्यायी गहाणासाठी गहाणदाराच्या घोषणा	२८.०५.२०१९, ११.१०.२०१९
६	समन्यायी गहाणासाठी नोंदीची ज्ञापन	२९.०५.२०१९, १४.१०.२०१९
७	समन्यायी गहाणासाठी पुष्ठीकरण गहाणदार पत्र	३१.०५.२०१९
८	करार कालावधी बदल आणि प्रभाराच्या पुष्ठीकरण	२९.०६.२०२१

४. मान्य करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यासाठी तुम्ही कसूरदार ठरला आहात आणि म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या विहित नियमांनुसार तुमचे खाते रोजी बँकेकडून एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. आम्ही वारंवार मागणी करूनसुध्दा तुम्ही तुमची थकीत रक्कम भरणा केली नाही.

५. तुम्ही अजूनही बँकेची थकबाकी अदा केलेली नाही, त्यामुळे सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी) अन्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून आणि बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता आणि वरील नमूद प्रक्रिया प्रलंबित असल्याने बँक सदर सूचना प्राप्त झाल्या तारखेपासून ६० दिवसात कॅशन पत सुविधेसाठी १३.०६.२०२३ पासून **रु. १,५५,२३,७७० अधिक न लावलेले व्याज, मुदत कर्ज सुविधेसाठी १३.०६.२०२३ पासून रु. ६५,९२,३८४ अधिक न लावलेले व्याज, जीइसीएल सुविधेसाठी १३.०६.२०२३ पासून रु. १८,८२,७४८.६१ अधिक न लावलेली व्याज आणि एफआयटीएल साठी १३.०६.२०१३ पासून रु. ४९,५७,७०६.९८ अधिक न लावलेले व्याज** संपूर्ण रक्कम चुकती करण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलविणे करीत आहे, कसूरवार ठरल्यास त्या व्यतिरिक्त आणि बँकेच्या हक्काला बाधा येवू न देता बँक सदरहू अधिनियमान्वये अंमलबजावणीयोग्य सदर तारण/मिळकतीच्या संदर्भात वरील सदर अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अन्वये सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी हक्कदार राहील. याबाबतीत तुम्ही पुढील सर्व दर, आकार आणि खर्च किंवा इतर अनुषंगिक आकार चुकते करण्यासाठीसुध्दा जबाबदार आहात, याची कृपया नोंद घ्यावी.

इतर बाबीसह अधिनियमान्वये उपलब्ध अधिकार-

ए) तारण मत्ता रोकड करण्यासाठी उपरोल्लिखित तारण हितसंबंध तयार करण्यात आलेल्या तारण मालमत्तेवर भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासह कब्जा घेणे.

बी) तारण मालमत्तेच्या भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणाच्या हक्कासह कर्जदारांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन ताब्यात घेणे आणि तारणांची रोकड करणे.

सी) ज्या मालमत्तेवर आमच्याकडून कब्जा घेण्यात आला आहे त्या तारण मालमत्तेकरिता कोणत्याही व्यक्तीची व्यवस्थापक म्हणून नेमणूक करणे आणि व्यवस्थापक तारण मालमत्तेचे व्यवस्थापन करतील आणि तुमच्याकडून हस्तांतरण होत असल्यास तारण मालमत्तेसंबंधित हस्तांतरितीच्या सर्व हक्कांशी तारण मालमत्तेचे हस्तांतरण निहित करण्यात येईल.

डी) कोणत्याही व्यक्तींना लिखित सूचना निर्गमित करावयाची असल्यास, अशा व्यक्ती ज्यांच्याकडून थकबाकी असून, त्यांनी सदर तारण मालमत्तेबाबत तारण हितसंबंध तयार करून तारण अनामत संपादन केली आहे, ती थकबाकी आम्हास भरणा करावी.

६. कृपया सूचना घ्यावी की, नियमातील कलम १३(१३) नुसार सूचनेच्या स्वीकृतीनंतर आमच्या लिखित संमतीशिवाय तारण मालमत्तेबाबत व्यवहार करणे वा निकालात काढण्याकरिता प्रतिबंध करण्यात येत आहे.

७. कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम ८ च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र करिता
सही/-
(चंदन किशोर)
मुख्य व्यवस्थापक
वाशी तुर्भे शाखा

सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्र. २०१-बी, २ रा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र.- बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रीयल ईस्टेट, ठाणे, महाराष्ट्र- ४००६०४.

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकारांनी आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना (दीवाण हाऊसिंग फायनान्स लि. द्वारे आयसीआयसीआय बँकेला देण्यात आलेल्या अभिस्तांकना अंतर्गत) डीएचएफएल आणि कर्जदार यांच्या दरम्यान झालेल्या कर्ज कराराला अनुसरुन गृहकर्ज सुविधा मंजूर करण्याच्या संदर्भात तारणाच्या अंमलबजावणीच्या संबधातील मागणी सूचना जारी केली आहेत. कर्जदारांनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेरोजीस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतलेला आहे. विशेषत: कर्जदार अणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करु नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक (डीएचएफएल ओल्ड लॅन आणि आयसीआयसीआय न्यु लॅन)	मिळकतीचे वर्णन/ सांकेतिक कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१.	अलिअब्बास गाझिहुसेन अन्सारी आणि सहिदान अलिअब्बास अन्सारी (ओल्ड डीएचएफएल लॅन-१९००००४५७१ आणि न्यु डीएचएफएल लॅन-क्युझेडएनएएस००००५०१५७३९)	रो हाऊस क्र. ३, प्लॉट क्र. १, सर्व्हे क्र. ३०/२/२बी, दर्शन रो हाऊस, एनएमसीओ कॅन्सर हॉस्पिटल मागे, अश्वमेध नगर समोर, पेठ रोड, नाशिक ४२२२०९/ जुलै १२, २०२३	मार्च २९, २०२३ रु. २,९९,४१२.००/-	नाशिक
२.	दिलीप अनंत पवार आणि दिव्या दिलीप पवार (ओल्ड डीएचएफएल लॅन- ०६९०००५८२९ आणि न्यु डीएचएफएल लॅन-क्युझेडकेएलव्हाय००००५०१७४००)	फ्लॅट क्र. १०५, १ ला मजला, अपार्टमेंट, साई कृपा अपार्टमेंट, टडकिकार नगर, मुरबाड ६६/५, मुरबाड, महाराष्ट्र, ठाणे ४२१४०१/ जुलै ११, २०२३	मार्च २३, २०२३ रु. ७,७५,४२१.००/-	कल्याण-मुंबई

वरील नमूद कर्जदार/हमीदार यांना रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर सूचना प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर गहाण मिळकतीची विक्री करण्यात येईल.

दिनांक : जुलै १५, २०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण: महाराष्ट्र **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

आडेली हायस्कूलमध्ये वह्यांचे वाटप

वेंगुर्ले : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कोकण विभाग अध्यक्षा अर्चना घारे-परब यांच्यातर्फे आडेली येथील कृषिरत्न काकासाहेब चमणकर हायस्कूलमध्ये वह्या वितरण कार्यक्रम १३ जुलै रोजी संपन्न झाला.

६० गुन्हे दाखल करून २३६ गोवंशाना दिले जीवनदान

नांदेड : नांदेड जिल्ह्यात सात महिन्यात प्राण्यांची अवैध वाहतुकप्रकरणी ६० गुन्हे दाखल करून २३६ गोवंशाना जीवनदान दिले आहे. नांदेड जिल्ह्यात गोवंश सबंधाने प्राण्यांची अवैध वाहतुकीस आळा बसणेकामी व जनावरांची अवैध वाहतुक करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी नांदेड जिल्ह्यातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या. सदर सूचनांच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील पोलीस स्टेशन हद्दीमध्ये नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ व प्राण्यांना क्रुरतेने वागविण्याचा प्रतिबंध १९६० अधिनियामान्वये विविध ठिकाणी कार्यवाही करुन गुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

अंबादास मानकापेला अटक

छत्रपती संभाजीनगर : आदर्श नागरी पतसंस्था घोटाळा प्रकरणी फरार असलेल्या अध्यक्ष अंबादास मानकापे यांना शुक्रवारी (दि. १४) रात्री पोलिसांनी शोधून काढले. गोलवाडी फाटा परिसरात लपून बसलेल्या मानकापे यांना रात्री ९ वाजेच्या सुमारास ताब्यात घेण्यात आले. तब्बल २०२ कोटींचे नियमबाह्य कर्ज वाटप केल्याप्रकरणी मानकापे यांच्यावर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून सर्व संचालक मंडळ फरार आहेत. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने शेकडो कोटींची नियमबाह्य कर्ज वाटप करण्यात आले होते. सन २०१६ ते २०१९ आणि २०१८ ते २०२२ या कालावधीतील कर्ज प्रकरणांमध्ये २०२ कोटी २४ लाख ६३ हजार ९६० रुपयांचा घोटाळा केल्याप्रकरणी अध्यक्षांसह ५० जणांविरुद्ध सिडको ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत. तारण कमी अन् कर्ज जास्त, कागदपत्रे अपूर्ण असे प्रकार लेखापरीक्षण चाचणीत समोर आल्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणात विशेष लेखापरीक्षक धनंजय चव्हाण आणि सुधाकर गायके हे दोघे फिर्यादी आहेत. चव्हाण यांनी २०१६ ते २०१९ आणि गायके यांनी २०१८ ते २०२२ या कालावधीचे लेखापरीक्षण केले आहे. चव्हाण यांनी १०३ कोटी आणि गायके यांनी ९९ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची फिर्याद दिली आहे. २०१६ ते २०१९ या कालावधीत केलेल्या चाचणी लेखापरीक्षणात पोटनियमातील अनेक तरतुदींचा भंग झाल्याचे आढळले. या कालावधीत आरोपींनी कट रचून २३ कर्जदारांना ९१ कोटी ७९ लाख ४४ हजार ६४ रुपयांचे विनातारण कॅश क्रेडिट कर्ज वाटप केले.

VAKRANGEE LIMITED

Vakrangee
Vakrangee Corporate House, Plot No.93, Road No.16, M.I.D.C. Marol
Andheri East, Mumbai, Maharashtra-400093
CIN: L65990MH1990PLC056669
Phone : 02267765100; Email id info@vakrangee.in; Website:- www.vakrangee.in

UN-AUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2023

Sr. No.	Particulars	Quarter Ended			Year Ended
		30-Jun-2023	31-Mar-2023	30-Jun-2022	31-Mar-2023
		Un-Audited	Audited	Un-Audited	Audited
1.	Total Income from Operations	5,589.84	5,179.50	4,871.82	19,870.48
2.	Net Profit/(Loss) for the period (before tax, exceptional and/or Extraordinary Items)	99.17	67.29	52.29	268.02
3.	Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary Items)	99.17	67.29	52.29	268.02
4.	Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary Items)	49.39	68.32	5.75	100.48
5.	Total Comprehensive Income for the period [comprising Profit/(Loss) for the period (after Tax) and Other Comprehensive Income (after Tax)]	57.36	76.07	-0.80	63.87
6.	Equity Share Capital	10,595.13	10,595.13	10,595.00	10,595.13
7.	Other Equity				1,789.97
8.	Earnings Per Share (of Re. 1/- each) for continuing and discontinued operations) 1. Basic: 2. Diluted :	0.00 0.00	0.01 0.01	(0.00) (0.00)	0.01 0.01

1. The above results have been approved, reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on Saturday, July 15, 2023. The Statutory Auditors of the Company have carried out a Limited Review of the results and issued an unqualified report.
2. The Consolidated Financial Statements for the quarter ended on June 30, 2023 are prepared in accordance with IndAS notified under Section 133 of the Companies Act, 2013.
3. The Company's standalone turnover is Rs. 4812.70 Lacs, profit before tax is Rs. 109.85 Lacs and profit after tax is Rs. 60.07 Lacs for the quarter ended June 30, 2023.
4. The Board of Directors of the Company recommended dividend of Rs.0.05 per share on fully paid equity share of Re.1/- each for the financial year ended March 31, 2023, subject to members approval in the ensuing Annual General Meeting.
5. The above is an extract of the detailed format of Quarterly and Year to date Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly and year to date financial results are available on the websites of the concerned Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com and also on the website fo the company at www.vakrangee.in.
6. Figures for the previous quarter has been regrouped and rearranged wherever necessary.

For and on behalf of board
Dinesh Nandwana
Managing Director & Group CEO

Date: July 05, 2023
Place: Mumbai

मठ येथील मंदिरातील फंडपेटीचे चोरट्यांकडून नुकसान

वेंगुर्ले : वेंगुर्ले तालुक्यातील मठ येथील श्री स्वयंभू मंदिरातील फंडपेटी गुरुवारी १३ जुलै रोजी रात्री अज्ञात चोरट्यानी फोडून त्यातील अंदाजे सुमारे २४ हजार रुपयांची रक्कम चोरी केल्याची तक्रार मंदिरातील पुजारी दत्ताजी रामचंद्र गुरव यांनी वेंगुर्ला पोलिसात केली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांवर विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मठ गावठणवाडी येथील दत्ताजी रामचंद्र गुरव हे श्री स्वयंभू मंदिरातील पूजा तसेच गाऱ्हाणी घालणे व रात्री मंदिर बंद करणे आदी काम पाहतात. दत्ताजी गुरव हे नेहमी प्रमाणे आज शुक्रवारी सकाळी ७.३० वाजता मंदिरात पूजेसाठी गेले असता त्यांना मंदिराच्या मुख्य दरवाजाचा कोयंडा तोडलेल्या स्थितीत दिसला. यानंतर आतमधील लोखंडी ग्रील सुद्धा फोडण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांच्या लक्षात आले. यावेळी त्यांनी देवस्थानचे अध्यक्ष मनोहर गावडे, मानकरी प्रकाश हरी ठाकूर, रामचंद्र सावळाराम गावडे यांना बोलावून त्यांना ही बाब सांगितली. यावेळी हे सर्वजण मंदिराच्या मागच्या बाजूस गेले असता पाठीमागे असलेला मुख्य गाभाऱ्यात जाणारा दरवाजा उघडा दिसला. या दरवाज्याची कडी तोडून चोरट्यानी आतमध्ये प्रवेश करून फंडपेटी फोडलेली होती.

याची तक्रार वेंगुर्ला पोलिसात दिली असून अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.